लोकमत

# विवेकानंद महाविद्यालयाला सर्वसाधारण विजेतेपद

## जिल्हास्तरीय युवा महोत्सव : मिरजेत गुरुवारी मध्यवर्ती युवा महोत्सव

लोकमत न्यूज नेटवर्क

**गडहिंग्लज :** शिवाजी विद्यापीठाच्या ४५ व्या जिल्हास्तरीय युवा महोत्सवातील सांघिक आणि वैयक्तिक स्पर्धेतील सर्वसाधारण विजेतेपद कोल्हापूरच्या विवेकानंद कॉलेजने पटकाविले. जिल्ह्यातील ७९ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी महोत्सवात भाग घेतला होता. येथील शिवराज विद्या संकुलात हा महोत्सव पार पडला. विजेत्या संघांची गुरुवारी (दि. १८) मिरज येथे होणाऱ्या मध्यवर्ती युवा महोत्सवासाठी निवड झाली आहे.

**कलाप्रकार आणि गुणानुक्रमे पहिले ५ विजेते असे :** लोकनृत्य - डी.के.टी.ई. इचलकरंजी, डी. वाय. पाटील इंजिनिअरिंग कोल्हापूर, दत्ताजीराव कदम महाविद्यालय इचलकरंजी, सदाशिवराव मंडलिक महाविद्यालय मुरगुड, विवेकानंद कॉलेज कोल्हापूर.

**लोककला** - सर्व अधिविभाग शिवाजी विद्यापीठ, न्यू कॉलेज कोल्हापूर, डॉ. डी. वाय. पाटील प्रतिष्ठानचे अभियांत्रिकी महाविद्यालय कोल्हापूर, शिवराज महाविद्यालय गडहिंग्लज, डी. आर. माने कॉलेज कागल. एकांकिका - कॉमर्स कॉलेज कोल्हापूर, सर्व अधिविभाग शिवाजी विद्यापीठ, शहाजी लॉ कॉलेज कोल्हापूर, न्यू कॉलेज कोल्हापूर, विवेकानंद कॉलेज कोल्हापूर.

**प्रहसिका** - कॉमर्स कॉलेज कोल्हापूर, भारती विद्यापीठाचे इंजिनिअरिंग कोल्हापूर, कन्या महाविद्यालय जयसिंगपूर, डी. वाय. पाटील इंजिनिअरिंग कोल्हापूर, सर्व अधिविभाग शिवाजी विद्यापीठ.

**मूकनाट्य** - भारती विद्यापीठाचे इंजिनिअरिंग कोल्हापूर, सदाशिवराव मंडलिक महाविद्यालय मुरगुड, आण्णासाहेब डांगे महाविद्यालय हातकणंगले, दत्ताजीराव कदम महाविद्यालय इचलकरंजी, विवेकानंद कॉलेज कोल्हापूर.

**पथनाट्य :** विवेकानंद कॉलेज कोल्हापूर, कॉमर्स कॉलेज कोल्हापूर, सदाशिवराव मंडलिक महाविद्यालय मुरगुड, सर्व अधिविभाग शिवाजी विद्यापीठ, विजयसिंह यादव कॉलेज पेठवडगाव.

**समूहगीत** - विवेकानंद कॉलेज कोल्हापूर, डी. वाय. पाटील इंजिनिअरिंग कोल्हापूर, शहाजी लॉ कॉलेज कोल्हापूर, कॉमर्स कॉलेज कोल्हापूर, राजाराम कॉलेज कोल्हापूर.

**वादविवाद** - शहाजी लॉ कॉलेज कोल्हापूर, केआयटी कोल्हापूर, घाळी कॉलेज गडहिंग्लज, न्यू कॉलेज कोल्हापूर, यशवंतराव चव्हाण कॉलेज हलकर्णी (चंदगड), प्रश्नमंजूषा - विवेकानंद कॉलेज कोल्हापूर, डी. वाय. पाटील इंजिनिअरिंग कोल्हापूर, डी. डी. सरकार कॉलेज कोल्हापूर, कॉलेज ऑफ नॉन कन्व्हेशनल वुमेन्स कॉलेज कोल्हापूर, घाळी कॉलेज गडहिंग्लज.

**एकपात्री अभिनय** - विवेकानंद कॉलेज कोल्हापूर, कॉलेज ऑफ नॉन कन्व्हेशनल वुमेन्स कॉलेज कोल्हापूर, कला महाविद्यालय गडहिंग्लज, सर्व अधिविभाग शिवाजी विद्यापीठ, दत्ताजीराव कदम कॉलेज इचलकरंजी.

**सुगम गायन** - देशभक्त रत्नाप्पाण्णा कुंभार कॉलेज कोल्हापूर, भोगावती महाविद्यालय कुरूकली, विवेकानंद कॉलेज कोल्हापूर, चंद्रबाई-शांताप्पा शेंडुरे कॉलेज हुपरी, सर्व अधिविभाग शिवाजी विद्यापीठ.

**वक्तृत्व मराठी :** डी. वाय. पाटील इंजिनिअरिंग कोल्हापूर, न्यू कॉलेज कोल्हापूर, शहाजी लॉ कॉलेज कोल्हापूर, घाळी कॉलेज गडहिंग्लज, शिवराज कॉलेज गडहिंग्लज. वक्तृत्व हिंदी : विवेकानंद कॉलेज कोल्हापूर, न्यू कॉलेज कोल्हापूर, जयवंत महाविद्यालय इचलकरंजी, दूधसाखर महाविद्यालय बिद्री, डी. वाय. पाटील इंजिनिअरिंग कोल्हापूर, वक्तृत्व इंग्रजी - विवेकानंद कॉलेज कोल्हापूर, शिव-शाहू महाविद्यालय सरूड, राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज कोल्हापूर, न्यू कॉलेज कोल्हापूर, देशभक्त रत्नाप्पाण्णा कुंभार कॉलेज कोल्हापूर.

लोकसत्ता

# दलित साहित्याने भारतीय साहित्याचा पैस वाढवला : डॉ. राजन गवस

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**कोल्हापूर** : महाराष्ट्राच्या बदललेल्या वाचनसंस्कृतीचे चित्र दलित साहित्यामध्ये प्रतिबिंबित झाले आहे. दलित साहित्याने भारतीय साहित्याचा पैस वाढवला, असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक डॉ. राजन गवस यांनी येथे केले. शिवाजी विद्यापीठातील मराठी, हिंदी आणि इंग्रजी अधिविभाग यांच्या संयुक्त विद्यमाने सरस्वती सन्मान विजेते ज्येष्ठ लेखक प्रा. शरणकुमार लिंबाळे यांचे 'भारतीय समाजवास्तवः लेखक व लेखनदृष्टी' या विषयावरील व्याख्यान आणि विशेष सत्कार समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते.

डॉ. गवस म्हणाले, दलित साहित्य ही भारतीय साहित्याला लाभलेली देणगी आहे. आंबेडकरी विचारविश्वाचा आविष्कार आणि वर्तमानाची उलटतपासणी लिंबाळे यांच्या साहित्यात आल्याने ते भारतीय स्तरावर पोहोचले.



प्रा. शरणकुमार लिंबाळे यांचा सत्कार करताना डॉ. राजन गवस, डॉ. विलास शिंदे.

साहित्यिक प्रा. शरणकुमार लिंबाळे म्हणाले, आपल्या भोवतालचे वातावरण अस्वस्थ करणारे आहे. आपल्या भाषेवर सांस्कृतिक साम्राज्यवाद आक्रमण करतो आहे. अशा काळात साहित्य हे सांस्कृतिक संवाद निर्माण करणारे असते.

लेखकाने सामाजिक भान ठेवून तसेच निर्भय होऊन लिहायला हवे. अध्यक्षीय मनोगतात कुलसचिव डॉ. शिंदे म्हणाले, आज माणसांच्या संवेदना संपत चाललेल्या आहेत. व्यक्त होण्यासाठी अनेक माध्यमे आपल्यासमोर आहेत. अशावेळी समाजाकडे डोळसपणे पाहून साहित्याने समाजाचे मूलभूत प्रश्न मांडले पाहिजेत.

डॉ. तृप्ती करेकट्टी यांनी प्रास्ताविक, मराठी अधिविभाग प्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांनी पाहुण्यांचे स्वागत, प्रांजली क्षीरसागर यांनी सूत्रसंचालन, डॉ. प्रभंजन माने यांनी आभार मानले.

पुढारी

# दलित साहित्याने भारतीय साहित्याचा पैस वाढवला : डॉ. गवस

**कोल्हापूरः पुढारी वृत्तसेवा**

दलित साहित्याने भारतीय साहित्याचा पैस वाढवला, असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक डॉ. राजन गवस यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील मराठी, हिंदी आणि इंग्रजी अधिविभाग यांच्या संयुक्त विद्यमाने सरस्वती सन्मान विजेते ज्येष्ठ लेखक प्रा. शरणकुमार लिंबाळे यांचे 'भारतीय समाजवास्तवः लेखक व लेखनदृष्टी' या विषयावरील व्याख्यान आणि विशेष सत्कार समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलसचिव डॉ. व्ही.एन.शिंदे होते.

डॉ. गवस म्हणाले, दलित साहित्य ही भारतीय साहित्याला लाभलेली देणगी आहे. महाष्ट्राच्या बदललेल्या वाचनसंस्कृतीचे चित्र दलित साहित्यामध्ये प्रतिबिंबित झाले आहे. आंबेडकरी विचारविश्वाचा आविष्कार आणि वर्तमानाची उलटतपासणी लिंबाळे यांच्या साहित्यात आली आहे. त्यामुळे लिंबाळे हे भारतीय स्तरावर पोहोचले.

प्रा. शरणकुमार लिंबाळे म्हणाले, भोवतालचे वातावरण अस्वस्थ करणारे आहे. भाषेवर सांस्कृतिक साम्राज्यवाद आक्रमण करतो आहे. अशा काळात साहित्य हे सांस्कृतिक संवाद निर्माण करणारे असते. लेखकाने सामाजिक भान ठेवून तसेच निर्भय होऊन लिहायला हवे. यावेळी डॉ. तृप्ती करेकट्टी यांनी प्रास्ताविक केले. मराठी अधिविभाग प्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांनी पाहुण्यांचे स्वागत केले. प्रांजली क्षीरसागर यांनी सूत्रसंचालन केले.डॉ. प्रभंजन माने यांनी आभार मानले. यावेळी डॉ. गोमटेश्वर पाटील, डॉ. चंद्रकांत लंगरे, डॉ. दीपक भादले, डॉ. मच्छिंद्र गोफणे, डॉ. श्यामसुंदर मिरजकर आदी उपस्थित होते.

पुढारी

# विद्यापीठातील बी.ए. फिल्म मेकिंगच्या 'भुंगा' लघुपटास द्वितीय क्रमांक

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील बी.ए. फिल्म मेकिंग अभ्यासक्रमच्या द्वितीय वर्षात शिकणाऱ्या प्रवीण पांढरे या विद्यार्थ्याने बनवलेल्या 'भुंगा' या लघुपटाला अजितपर्व या राज्यस्तरीय लघुपट महोत्सवात जिल्हास्तरीय द्वितीय क्रमांक मिळाला. अभिनेते अरुण नलावडे, मकरंद अनासपुरे, अभिनेत्री देविका दफ्तरदार, मिलिंद दास्ताने यांच्या हस्ते त्याला गौरविण्यात आले. लघुपटात संजना परब, विकास कांबळे, तन्मय राऊत, चंद्रकांत मधाळे, विश्वजित पांढरे यांनी भूमिका साकारल्या आहेत. लघुपटाचे लेखन दिग्दर्शन व संकलन पांढरे यांनी केले. छायाचित्रण अनंजय साठे तर अश्वजित तरटे यांनी केले आहे. या लघुपट महोत्सवात जवळपास ३५० हून अधिक लघुपट आले होते.

1 5 SEP 2025

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# युवा महोत्सवात कलांचा आविष्कार

## 'विवेकानंद'ला सर्वसाधारण विजेतेपद; विविध महाविद्यालयांतील १२०० हून अधिक विद्यार्थ्यांचा सहभाग

**गडहिंग्लज : पुढारी वृत्तसेवा**

येथे झालेल्या ४५ व्या जिल्हास्तरीय युवा महोत्सवात विवेकानंद कॉलेजने विविध कला प्रकारांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करत सर्वसाधारण विजेतेपद पटकावले. शिवराज महाविद्यालयाच्या प्रांगणात शनिवारी झालेल्या या महोत्सवात जिल्ह्यातील १२ हून अधिक महाविद्यालयांमधील १,२०० हून अधिक विद्यार्थ्यांनी भाग घेतला होता.

या महोत्सवात लोकनृत्य, लोककला, समूहगीत, एकांकिका, मुकनाट्य, पथनाट्य, एकपात्री अभिनय आणि वादविवाद अशा अनेक कलाप्रकारांचे सादरीकरण करण्यात आले. विद्यार्थ्यांनी राजस्थानी भुई नृत्य, केरळचे करिकट्टम, आणि आदिवासी गोंडी यांसारख्या विविध लोकनृत्यांनी प्रेक्षकांची मने जिंकली. तर, ढोलकी आणि तबल्याच्या जुगलबंदीने सादर होणारी लावणी आणि शाहिरी पोवाड्यांनी महाराष्ट्राच्या गौरवशाली परंपरेचे दर्शन घडवले.



**गडहिंग्लज : शिवराज महाविद्यालयात कला प्रकारांचे सादरीकरण करताना विद्यार्थिनी.**

या महोत्सवात केवळ कलाविष्कारच नाही, तर विद्यार्थ्यांनी एकांकिका आणि मुकनाट्याच्या माध्यमातून समाजातील ज्वलंत प्रश्नही मांडले. शेतकरी समस्या, मणिपूरमधील घटना, भ्रष्टाचार आणि मोबाईलच्या अतिवापरामुळे तरुणाईवर होणारे दुष्परिणाम यांसारख्या विषयांवर त्यांनी प्रभावीपणे प्रकाश टाकला. त्यांच्या या सादरीकरणाला प्रेक्षकांनी भरभरून दाद दिली. यावेळी शिवराज विद्या संकुलाचे अध्यक्ष प्रा. किसनराव कुराडे, सचिव डॉ. अनिल कुराडे, उपाध्यक्ष के. जी. पाटील, ॲड. दिग्विजय कुराडे, प्रा. विश्वजित कुराडे, संचालक प्रा. बीनादेवी कुराडे, प्राचार्य डॉ. एस. एम. कदम उपस्थित होते.

### स्पर्धेचा निकाल असा...

- **लोकनृत्य :** दत्ताजीराव कदम टेक्निकल एज्युकेशन सोसायटीचे टेक्स्टाईल ॲन्ड इंजिनिअरिंग इन्स्टिट्यूट इचलकरंजी, डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग कोल्हापूर, दत्ताजीराव कदम कला, विज्ञान अँड वाणिज्य कॉलेज इचलकरंजी. लोककला : सर्व अधिविभाग शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, दि न्यू कॉलेज कोल्हापूर, डॉ. डी. वाय. पाटील प्रतिष्ठान कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग कोल्हापूर, एकांकिका : देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स कोल्हापूर, सर्व अधिविभाग शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, शहाजी लॉ कॉलेज कोल्हापूर.
- **प्रहसिका :** देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स कोल्हापूर, भारती विद्यापीठाचे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग कोल्हापूर, श्रीमती गंगाबाई खिवराज घोडावत कन्या महाविद्यालय जयसिंगपूर.
- **मूकनाट्य :** भारती विद्यापीठाचे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग कोल्हापूर, सदाशिवराव मंडलिक महाविद्यालय मुरगूड, अण्णासाहेब डांगे कला, वाणिज्य हातकणंगले.
- **पथनाट्य :** विवेकानंद कॉलेज कोल्हापूर, देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ वाणिज्य कोल्हापूर, सदाशिवराव मंडलिक महाविद्यालय मुरगूड.
- **सुगम गायन :** देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ वाणिज्य कोल्हापूर, भोगावती महाविद्यालय कुरूकली, विवेकानंद कॉलेज कोल्हापूर.
- **वक्तृत्व मराठी :** डॉ. डी. वाय. पाटील प्रतिष्ठान कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग कोल्हापूर, दि. न्यू कॉलेज कोल्हापूर, शहाजी लॉ कॉलेज कोल्हापूर.
- **भारतीय समूहगीत :** विवेकानंद कॉलेज कोल्हापूर, डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग कोल्हापूर, शहाजी लॉ कॉलेज कोल्हापूर.
- **वाद-विवाद :** शहाजी लॉ कॉलेज कोल्हापूर, के.आय.टी.कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग कोल्हापूर.
- **प्रश्नमंजुषा :** विवेकानंद कॉलेज कोल्हापूर, डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग कोल्हापूर, डी. डी. शिंदे सरकार कॉलेज कोल्हापूर. एकपात्री
- **अभिनय :** विवेकानंद कॉलेज कोल्हापूर, कॉलेज ऑफ नॉन-कन्व्हेन्शनल व्होकेशनल कोर्स फॉर वूमन कोल्हापूर, कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय गडहिंग्लज.
- **वक्तृत्व हिंदी :** विवेकानंद कॉलेज कोल्हापूर, दि न्यू कॉलेज कोल्हापूर, जयवंत महाविद्यालय इचलकरंजी.
- **वक्तृत्व इंग्रजी :** विवेकानंद कॉलेज कोल्हापूर, श्री शिव-शाहू महाविद्यालय सरूड, राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज कोल्हापूर यांनी अनुक्रमे क्रमांक मिळविले.

1 5 SEP 2025
पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# फोटोग्राफीत करिअरसाठी कौशल्ये आवश्यक

## सुधीर बोरनाक; विद्यापीठात फोटोग्राफीचे हँडस् ऑन ट्रेनिंग

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

फोटोग्राफीमध्ये उत्तम करिअर आहे. त्यासाठी सातत्य आणि किमान काही कौशल्ये असणे आवश्यक आहे, असे मत ट्रेनर सुधीर बोरनाक यांनी व्यक्त केले. शिवाजी विद्यापीठाच्या मास कम्युनिकेशन विभागाच्या वतीने आयोजित एकदिवसीय कार्यशाळेत विद्यार्थ्यांना फोटोग्राफीचे हँडस् ऑन ट्रेनिंग देण्यात आले. यामध्ये बोरनाक यांनी कॅमेरा हाताळणीचे धडे दिले, यावेळी ते बोलत होते.

बोरनाक म्हणाले, मोबाईल तंत्रज्ञान विकसित झाले असले तरी कॅमेऱ्याचे महत्त्व बिलकुल कमी झालेले नाही. उलट कॅमेऱ्यामध्ये अनेक नवनवे प्रयोग होत असून, फोटोची गुणवत्ता वाढवण्यासाठी मोठ्या प्रमाणामध्ये गुंतवणूक होत आहे.



यास कार्यशाळेच्या पहिल्या सत्रामध्ये विद्यार्थ्यांना कॅमेऱ्याची तपशीलवार माहिती देण्यात आली. कॅमेऱ्यातील तांत्रिक बाबी सोप्या शब्दात त्यांनी समजावून दिल्या. कॅमेरा हाताळत असताना कोणती दक्षता घ्यावी, याविषयी त्यांनी मार्गदर्शन केले. दुपारच्या सत्रामध्ये विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष कॅमेरा हाताळणीचे प्रशिक्षण देण्यात आले. मास कम्युनिकेशन विभागासमोर, तसेच विद्यापीठाच्या मुख्य इमारतीसमोर विद्यार्थ्यांकडून प्रात्यक्षिक करून घेतले. कॅमेरा हाताळताना येणाऱ्या अडचणींची सोडवणूकही यावेळी करण्यात आली. विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांना बोरनाक यांनी उत्तरे दिली.

स्वागत जयप्रकाश पाटील यांनी केले. प्रास्ताविक मास कम्युनिकेशनचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी केले. आभार डॉ. सुमेधा साळुंखे यांनी मानले. कार्यशाळेमध्ये कोल्हापूर, सांगली तसेच सीमाभागातून अनेक जण सहभागी झाले होते. विद्यार्थ्यांसोबतच हौशी आणि व्यावसायिक फोटोग्राफरही कार्यशाळेला उपस्थित होते.

सकाळ



आंबा : शाहूवाडी येथील प्रवीण पांढरे याने बनवलेल्या भुंगा लघुपटास जिल्हास्तरीय द्वितीय क्रमांक मिळवल्याबद्दल त्याला मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले.

# भुंगा लघुपटास द्वितीय क्रमांक

आंबा : शाहूवाडी येथील प्रवीण पांढरे या महाविद्यालयीन विद्यार्थ्याने बनवलेल्या 'भुंगा' या लघुपटास अजितपर्व या राज्यस्तरीय लघुपट महोत्सवात जिल्हास्तरीय द्वितीय क्रमांक प्राप्त झाला. पांढरे सध्या शिवाजी विद्यापीठात बी. ए. फिल्म मेकिंगच्या द्वितीय वर्षात शिकत आहे. त्याला प्रसिद्ध अभिनेते अरुण नलावडे, मकरंद अनासपुरे, अभिनेत्री देविका दप्तरदार, मिलिंद दास्ताने यांच्या हस्ते गौरवले. हा लघुपट बनवण्यासाठी फिल्म मेकिंग विभागप्रमुख डॉ. शिवाजी जाधव, लेखक, दिग्दर्शक फिल्म मेकिंग शिक्षक अनुप जत्राटकर यांचे मार्गदर्शन लाभले. लघुपटात संजना परब, विकास कांबळे, तन्मय राऊत, चंद्रकांत मधाळे, विश्वजित पांढरे यांनी भूमिका साकारल्या आहेत. लघुपटाचे लेखन, दिग्दर्शन आणि संकलन प्रवीण पांढरे यांनी केले आहे. लघुपट महोत्सवात साडेतीनशेहून अधिक लघुपट होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

15 SEP 2025
सकाळ

# विद्यार्थ्यांना फोटोग्राफीचे हँडस् ऑन ट्रेनिंग

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १४ : शिवाजी विद्यापीठाच्या मास कम्युनिकेशन विभागातर्फे एकदिवसीय कार्यशाळेत विद्यार्थ्यांना फोटोग्राफीचे हँडस् ऑन ट्रेनिंग देण्यात आले. सुधीर बोरनाक यांनी उपस्थितांना प्रत्यक्ष कॅमेरा हाताळणीचे धडे दिले.

'मोबाईल तंत्रज्ञान विकसित झाले असले तरी कॅमेऱ्याचे महत्त्व बिलकुल कमी झालेले नाही. उलट कॅमेऱ्यामध्ये अनेक नवनवे प्रयोग होत असून फोटोची गुणवत्ता वाढवण्यासाठी मोठ्या प्रमाणामध्ये गुंतवणूक होत आहे. फोटोग्राफीमध्ये उत्तम करिअर असले तरी त्यासाठी सातत्य आणि किमान काही कौशल्ये असणे आवश्यक आहे', असे मत सुधीर बोरनाक यांनी व्यक्त केले.

या कार्यशाळेच्या पहिल्या सत्रामध्ये विद्यार्थ्यांना कॅमेऱ्याची तपशीलवार माहिती देण्यात आली. कॅमेरा हाताळत असताना कोणती दक्षता घ्यावी, याविषयी त्यांनी मार्गदर्शन केले. दुपारच्या सत्रामध्ये विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष कॅमेरा हाताळणीचे प्रशिक्षण देण्यात आले. मास कम्युनिकेशन विभागासमोर तसेच विद्यापीठाच्या मुख्य इमारतीसमोर विद्यार्थ्यांकडून प्रात्यक्षिक करून घेतले. जयप्रकाश पाटील यांनी स्वागत केले. मास कम्युनिकेशनचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी प्रास्ताविक केले. डॉ. सुमेधा साळुंखे यांनी आभार मानले.

15 SEP 2025

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# जगणे सुसह्य करणारे अभियंते

**मानवाचे कष्ट कमी कसे होतील, यासाठी सातत्याने प्रयत्न केले जातात, नवनवे शोध लावले जातात. त्यासाठी प्रयोगशाळांत शास्त्रज्ञ सातत्याने कार्यरत असतात. तेथे लागलेल्या शोधांचे फायदे सर्वसामान्यांपर्यंत कसे पोहोचतील, यासाठीचे कार्य तंत्रज्ञ आणि अभियंते करत असतात. सर मोक्षगुंडम विश्वेश्वरैय्या यांचा जन्मदिन 'अभियंता दिन' म्हणून साजरा करून त्यांच्या एकूणच कार्याला सलाम केला जातो.**

**- डॉ. व्ही. एन. शिंदे**

आजच्या स्थापत्य (सिव्हिल), विद्युत (इलेक्ट्रिक), रसायन (केमिकल), इलेक्ट्रॉनिक, संगणक (कॉम्प्युटर), माहिती तंत्रज्ञान (इनफॉर्मेशन टेक्नॉलॉजी), यांत्रिकी (मेकॅनिकल), पर्यावरण (इन्व्हायर्मेंट) अशा अनेक मूलभूत तंत्रशाखा तयार झाल्या आहेत. या सर्वांची सुरुवात वैज्ञानिक शोधातून झाली. त्या शोधानुसार आता अनेक उपशाखा तयार झाल्या आहेत. अंतराळ (स्पेस), संवाद (कम्युनिकेशन), एरोनॉटिकल, प्रॉडक्शन, कृषी, जैववैद्यक अशा उपशाखा आज अस्तित्वात आल्या आहेत. त्या-त्या क्षेत्रात उपकरणांचा आणि तंत्रज्ञानाचा विकास करून मानवाचे जीवन सुखकर करण्यासाठी अनेक लोक कार्यरत असतात. जेम्स क्लर्क मॅक्सवेल यांच्या चार सूत्रांच्या शोधानंतर पुढे अभियंत्यांनी कार्य केले नसते, तर वायरलेस तंत्रज्ञानापासून आजच्या मोबाईलपर्यंतचे शोध लागले नसते आणि आजच्यासारखे आपणास क्षणाक्षणाला जगाच्या कानाकोपऱ्यातील नातेवाईक आणि सुहृदांच्या संपर्कात राहू शकले नसते. ज्युल आणि थॉम्सन यांनी हवा प्रसरण पावताना ती थंड होते, याचा शोध लावला. मात्र, अभियंत्यांनी त्यातून वातानुकूलन यंत्र बनवले. त्याच तत्त्वाचा उपयोग करत शीतकरण यंत्र म्हणजेच फ्रीझ बनवला. अभियंते, तंत्रज्ञान यांनी केलेल्या कार्यामुळेच पक्क्या घरांपासून सर्व भौतिक सुखांचा आनंद उपभोगू शकतो. या साऱ्यांच्या कार्यांचा गौरव म्हणून 'अभियंता दिन' साजरा केला जातो.

## भारताच्या प्रगतीत योगदान

**भारत आज अमेरिकेचे उपग्रह आपल्या सॅटेलाईट लाँच व्हेइकलच्या साहाय्याने अवकाशात सोडत आहे. दोन वर्षे धान्याचा एक दाणाही पिकला नाही, तरी पुरेल इतके धान्य आपल्या गोदामात आहे. उपचार घेण्यासाठी आज विदेशातून लोक येत आहेत. वाहनांची निर्मिती होत आहे. क्षेपणास्त्रे विकसित करण्यात येत आहे. या सर्व प्रगतीमध्ये संशोधकांचे संशोधन जितके महत्त्वाचे, तितकेच महत्त्वाचे अभियंत्यांचे योगदान आहे.**

भारतासोबतच इतर देशांतही विविध दिवशी अभियंता दिन साजरा करण्यात येतो. युनेस्कोने आंतरराष्ट्रीय अभियंता दिन ४ मार्च रोजी साजरा करण्यात येईल असे जाहीर केले आहे. भारतात थोर अभियंते भारतरत्न मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यांच्या जन्मदिनी १५ सप्टेंबरला अभियंता दिन साजरा केला जातो.

संशोधन ही निरंतर चालणारी एक प्रक्रिया आहे. त्याप्रमाणे तंत्रज्ञानात बदल होत आहेत. अभियंत्यांचे कार्यही संशोधनाशी समांतर चालत आहे. त्यांच्या कार्यातून लोकांचे, जनसामान्यांचे जगणे सुखकर होत आहे. आज शाश्वत तंत्रज्ञानाची संकल्पना लोकांमध्ये रूजत आहे, त्यासाठी प्रयत्न करणाऱ्या सर्व अभियंत्यांना शुभेच्छा.

**(लेखक शिवाजी विद्यापीठात कुलसचिव आहेत.)**

1 5 SEP 2025

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# आमचा अजेंडा शैक्षणिक प्रगतीचा

## डॉ. प्रदीप खेडकर : शिवाजी विद्यापीठात शैक्षिक महासंघाची स्थापना

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १४ : 'निव्वळ आंदोलनाचा नव्हे, तर शैक्षणिक प्रगतीचा आमचा अजेंडा आहे. त्यादृष्टीने शिवाजी विद्यापीठ कार्यक्षेत्रात अखिल भारतीय राष्ट्रीय शैक्षिक महासंघ (एबीआरएसएम) काम करणार आहे. शिक्षक, विद्यार्थी, कर्मचारी, संस्थाचालक आदींचे प्रलंबित प्रश्न सोडविण्यासाठी आम्ही ताकदीने प्रयत्न करणार असल्याचे या महासंघाचे अध्यक्ष डॉ. प्रदीप खेडकर यांनी आज येथे सांगितले.



**कोल्हापूर** : शिवाजी विद्यापीठात रविवारी अखिल भारतीय शैक्षिक महासंघाचे अध्यक्ष डॉ. प्रदीप खेडकर यांचा सत्कार करताना डॉ. निखिल गायकवाड. यावेळी शेजारी डॉ. रामचंद्र पवार, सुजाता कुलकर्णी, डॉ. शशिकांत तांबे उपस्थित होते.

विद्यापीठातील निलांबरी सभागृहात या महासंघाच्या कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यातील नव्या कार्यकारिणीची घोषणा आणि प्राध्यापकांच्या बैठकीत ते बोलत होते. महासंघाचे डॉ. दिलीप अर्जुने, डॉ. शशिकांत तांबे प्रमुख उपस्थित होते. केजी टू पीजी पर्यंतचे शैक्षणिक, विद्यार्थी, शिक्षक, संस्थाचालक, कर्मचाऱ्यांचे प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला जाईल. महासंघ केवळ आंदोलन करण्यासाठी नसून विद्यार्थी आणि शिक्षकांमध्ये राष्ट्रीय मूल्य रुजविणे, राष्ट्राच्या जडणघडणीमध्ये आपले योगदान आणि राष्ट्रीय शैक्षणिक धोरण उत्तम प्रकारे राबविणे यासाठी कार्यरत राहील, असे त्यांनी सांगितले. यावेळी माजी आमदार भगवानराव साळुंखे, डॉ. वसंत हेळवी, आर. व्ही. गुरव, राहुल माने आदी उपस्थित होते.

### विद्यापीठातील महासंघाची कार्यकारिणी

■ शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर विभागीय कार्यकारिणी (अनुक्रमे अध्यक्ष, उपाध्यक्ष, महामंत्री, कोषाध्यक्ष)- डॉ. निखिल गायकवाड, सुजाता कुलकर्णी, शार्दुल सेलूकर, रामचंद्र पवार. विद्यापीठ कॅम्पस कार्यकारिणी- डॉ. गायकवाड, प्रतिभा देसाई, पी. डी. पाटील, सुभाष कोंबडे. कोल्हापूर जिल्हा कार्यकारिणी- डॉ. शरद बनसोडे, आरती नाडगोंडा, धनंजय पाटील, सूर्यकांत पंडित. सांगली जिल्हा कार्यकारिणी- डॉ. शोभा मधाळे, शिवराम खडके, डॉ. राजगुरू. सातारा जिल्हा कार्यकारिणी- प्रा. अभय जायभाये.

### आगामी निवडणूक महासंघ लढविणार

■ 'महासंघाची व्याप्ती देशभरात असून महाराष्ट्रातील दहा विद्यापीठांत शाखा कार्यान्वित आहेत. शिवाजी विद्यापीठात आज शाखा सुरू झाल्याचे समाधान वाटत आहे. या विद्यापीठाच्या सिनेट आणि अन्य अधिकार मंडळाची निवडणूक महासंघ लढविणार असल्याचे डॉ. खेडकर यांनी सांगितले.

15 SEP 2025

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# डॉ. पाटील विद्यार्थ्यांचे आयुष्य घडविणारे शिक्षक

- डॉ. एस.बी. ओगले यांचे प्रतिपादन
- शिवाजी विद्यापीठात आंतरराष्ट्रीय स्मरणिकेचे प्रकाशन

प्रतिनिधी
कोल्हापूर



कोल्हापूर :आंतरराष्ट्रीय परिषदेच्या स्मरणिकेचे प्रकाशन करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. एस.बी. ओगले. सोबत डॉ. तुकाराम डोंगळे, डॉ. पवार, प्रा. कीम, प्र-कुलगुरु डॉ. पाटील, डॉ. शर्मा व इतर.

ज्येष्ठ संशोधक डॉ. पी.एस. पाटील म्हणजे विद्यार्थ्यांचे आयुष्य उजळवून टाकणारे शिक्षक आहेत, असे गौरवोद्गगार पुण्याच्या ' कोलकता येथील 'राइज'चे संचालक डॉ. एस.बी. ओगले यांनी काढले.

शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू तथा जागतिक ख्यातीचे ज्येष्ठ संशोधक डॉ. प्रमोद पाटील यांच्या सेवानिवृत्तीप्रित्यर्थ आयोजित परिषदेत बोलत होते. 'पायोनियरिंग सायन्स अँड प्रोग्रेसः नॅनो टेक्नॉलॉजी फॉर सस्टेनेबल डेव्हलपमेंट' हा या परिषदेचा विषय आहे. कुलगुरू डॉ. शिर्के अध्यक्षस्थानी होते.

दक्षिण कोरियाच्या नॅशनल चोन्नम युनिव्हर्सिटीचे प्रा. जे. एच. कीम म्हणाले, डॉ. पाटील यांच्याबरोबर शंभरहून अधिक आंतरराष्ट्रीय शोधनिबंधांसाठी संशोधनकार्य करता आले. तैवानच्या नॅशनल इवांग ह्वा युनिव्हर्सिटीचे प्रा. वाय. आर. मा म्हणाले, प्रा. पाटील हे जागतिक संशोधन क्षेत्रातले 'कोल्हापूरचे खरे पाणी' आहे. अध्यक्षस्थानावरून बोलताना कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, डॉ. पाटील यांच्या आंतरराष्ट्रीय पटलावरील वावराचा संशोधकांना लाभ झाला. डॉ. किरणकुमार शर्मा यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. सुभाष माने यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. पवार यांनी आभार मानले. यावेळी ज्येष्ठ संशोधक डॉ. पवार, डॉ. डोंगळे, डॉ. वडगांवकर, डॉ. देशमुख, डॉ. डेळेकर उपस्थित होते.

## सामंजस्य करार आणि टेक्नॉलॉजी ट्रान्स्फर

शिवाजी विद्यापीठाबरोबर दक्षिण कोरियातील चोन्नम नॅशनल युनिव्हर्सिटीने सामंजस्य करार केला. या नूतनीकृत कराराचे कुलगुरू डॉ. शिर्के आणि डॉ. कीम यांच्या उपस्थितीत हस्तांतरण करण्यात आले. कोरियाच्या प्रा.एस.डब्ल्यू. शीन, प्रा. एस.एच. कांग यावेळी उपस्थित होत्या. कंपनीचे चेअरमन तथा व्यवस्थापकीय संचालक संजीव तुंगतकर यावेळी उपस्थित होते.